# लहरी अभंगावली

लेखक : संत जैरामदास उर्फ लहरीबाबा



॥ श्री गुरूदेव प्रसन्न ॥

श्री संत जैरामदास उर्फ लहरीबाबा
द्वारा लिखीत



आत्म अनुभव

# लहरी अभंगावली

मराठी भाग २

द्वितीय आवृत्ती

- प्रकाशन तिथी -

जन्म सप्ताह समारोह (२००४)

■ लहरी अभंगावली

■ रचयिता

संत जैरामदास

■ प्रकाशक

श्री. लहरी आश्रम कामठा,

जि. गोंदिया

© श्री. लहरी आश्रम कामठा

■ प्रकाशन तिथी

द्वितीय आवृत्ती (५००)

जन्म सप्ताह समारोह (२००४)

लहरी आश्रम, कामठा

■ अक्षर जुळवणी

संजय तराळ

संविस कॉम्प्यूटर्स, अमरावती

■ मुद्रक

न्यु पंचशील ऑफसेट, गांधीचौक,

अमरावती.

■ मूल्य : रूपये ७/-



(१)

होसी त्याचा दास, तेव्हां कृपा करी।
ऐकुनीया घेई, गुरू पुत्रा ॥ १ ॥
किती शास्त्र जरी, पठन तु केले।
सुखी नाहीं झाला, जीव तुझा ॥ २ ॥
सुखासी पाहण्या, लीन बहु व्हावे।
दया ती ठेवावी, सर्व जीवा ॥ ३ ॥
समदृष्टि पाहा, आपुल्या हृदयी।
तेव्हां दया करी, गुरूराव ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे, खरे सांगो तुम्हां
खोटे मानु नका, या बोलासी ॥ ५ ॥

(२)

नका लावूं खोटें पाप, मिळे पुढे तुम्हा दुःख।
निंदा करूं नका खोटी, जिवनी पडे आटाआटीं ॥
तुटे ईश्वराची वाट, योनी मिळेल भूतात।
टाकुं नका खोटे जाळे, हिशेब होई यमापुढे ॥
द्याल कोणा दुःख, जाण पुढे तुम्हां नर्क खाण।
देवापुढे बळी घ्याल, होती तुम्हां पुढे हाल।
खऱ्याचा न कराल विश्वास, जैराम म्हणे पुढे तुमचा नाश ॥

(३)

करून घेरे निंदा बटकीच्या पोरा।
जासील यमद्वारा खोटे नाही ॥ १ ॥
भोळ्या भावीकांना जो नर फसवील।
होईल पुढे बैल तेलीयाचा ॥ २ ॥
फिरेल तो घाना होऊनिया बैल।

विसावा न मिळे जन्मभरी ॥ ३ ॥
देह दंड भोग मिळेल तयासी ।
जैरामदास म्हणे वाट कुकर्माची ॥ ४ ॥

(४)

तुच देवा माझा कुटूंब परिवार ।
करण्या उद्धार तूच एक ॥ १ ॥
तुच असे माझा मित्र सखा बंधु ।
कृपासागर सिंधु पांडुरंगा ॥ २ ॥
तुच असे माझा मित्र सखा बंधु ।
कृपासागर सिंधु पांडुरंगा ॥ ३ ॥
तुच माझी आई तुच माझा बाप ।
हरण्या त्रिताप कोणी नाही ॥ ४ ॥
तुच माझा गुरू तुची गा कैवारी ।
चौऱ्याशीच्या फेरी तुची तोडी ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे दयेच्या सागरा ।
तुम्ही कृपा करा बाळावरी ॥ ५ ॥

(५)

सत्याचा अहंकार राहो शिरावरी ।
मागणे श्रीहरी हेची मज ॥ १ ॥
प्राण जावो तरी राहो सत्य वाणी ।
तुझे ध्यान मनी राहो सदा ॥ २ ॥
मायेचा हा वारा न लागो मजसी ।
मागणे तुजसी हेची देवा ॥ ३ ॥
सत्यकामाकरतां जावो माझा प्राण ।
देह अभिमान नये मनी ॥ ४ ॥

जैरामदास म्हणे प्रण पूर्ण करी।
अंतरी तूं हरी राहो सदा॥ ५॥

(६)

राम नामें घेई ग्रास, तेन्हां होई सुख जीवास।
नाव घेता देवाजीचे, पाश तुटतील मायेचे॥ १॥
मुखी स्मरता हरी, देव होईल कैवारी।
होई संसार सुखाचा, धोका नाही काळोबाचा॥ २॥
सर्वकाळ हरी बोला, सुख होईल जिवाला।
जैराम म्हणे तो संसारी, जन्मा येवूनी देव जोडी॥ ३॥

(७)

माझे मन आहे पहावे श्रीहरी। मिळे कैशापरी पांडुरंग ॥ १॥
त्यांच्या भेटीवीण झोप नाही नैना। मिळे कैसी चैना या जिवासी॥ २॥
शस्त्र हे पुराण वाचन म्या केले। शांती ना मिळाली माझे जिवा॥ ३॥
रानावनांतरी भटकत राहिलो। नाहीं तो पाहिला पांडुरंग॥ ४॥
नाना तिर्थस्थान देवालय शोधिले। तेथे ना मिळाले पांडुरंग॥ ५॥
लावूनी खेचरी बैसलो आसनी। परी माझा भ्रम मिटला नाहीं॥ ६॥
जैरामदास म्हणे हरिची ती कळा। जाने ओ बिरला गुरू पुत्र॥ ७॥

(८)

आळशी जो नर झोपून राहील, आयुष्य खोईल झोपे मध्ये॥ १॥
झोपे मध्ये येथे जाईल जो प्राणी, करील तो हानी जिवनाची॥ २॥
जिवनाची हानी करी माये पायी, विसावा त्या नाहीं त्रैलोक्यांत ॥ ३॥
त्रैलोक्यांत नाहीं मिळणार थारा, वाटोळे हे सारे जीवनाचे ॥४॥
पिशाच्या प्रमाणें फिरे सैरा वैरा, नाहीं त्याशी थारा तिन्हा लोकी॥ ५॥
ज्याचे पाशी नाहीं हरिचे हे नांव, नाही त्यास ठाव भूमीवरी॥ ६॥
जैरामदास म्हणे व्हारे सावधान, सत्याचे निशाण धरा मनी॥ ७॥

(९)

हरिच्या नामासी जागतो जो प्राणी, जन्मा तो येवुनी धन्य झाला ॥ १ ॥
धन्य झाला तोची राहोनी प्रपंची, देवाशी हा चिंती वेळोवेळी ॥ २ ॥
वेळोवेळी मुखी घेई हरीनाम, कामातही राम पाही डोळा ॥ ३ ॥
नाहीं कुठे उणे त्र्यैलोक्यांत त्याला, जीवन मुक्त झाला जैराम म्हणे ॥ ४ ॥

(१०)

पर जिवा करता कष्टवीत देह, जाणा तोची देव जगी खरा ॥ १ ॥
रात्रंदिनीं सेवा हीच तळमळ, आठवी गोपाळ अहरनीशी ॥ २ ॥
अहरनिशी ध्यान सत्यकामाकडे, मन नित्य जडो हरिध्यानी ॥ ३ ॥
जन्मा येवूनीया पाळी जो नियम, तो कैसा यमद्वार पाही ॥ ४ ॥
नामाच्या ठिकाणी येत नाही काळ, राही तो तात्काळ दूरी त्याचा ॥ ५ ॥
जैराम म्हणे ज्याचे मुखी असे नावं, देव त्यास ठाव तोच देई ॥ ६ ॥

(११)

संताचे चरण अमोल हे फळ, उद्धरी तो कुळ जन्मांतरीचे ॥ १ ॥
येवुनिया जगी हितासी जागेल, ह्या सदा घेत परमात्म्याची ॥ २ ॥
सर्व ठायी पाहे डोळ्यानें तो हरि, संसार सागरी जना सवे ॥ ३ ॥
ऐसे जे नियम असे ज्याचे अंगी, तोच असे जगी विश्व व्यापी ॥ ४ ॥
सुधन्वा तारण्या धावुनिया आला, धन्य तू गोपाला दासा पाई ॥ ॥
जैरामदास म्हणे भक्ताचा कैवारी, संकटे निवारी वेळोवेळी ॥ ६ ॥

(१२)

जिभेसी सत् ब्रेक लावियला ज्याने ।
जिंकले मानवानें तिन्ही लोक ॥ १ ॥
प्रपंच परमार्थ करी सत्य पर्णे ।
प्रेमभावे वर्ती सर्व जीवां ॥ २ ॥
सर्व जिवावरी ठेवीतसे दया ।

विठुराया त्याचा दास होई ॥ ३ ॥
गंगेचे प्रमाणे मन ते निर्मळ।
देव त्याचे जवळी कामे करी ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे ऐसा जो रंगला।
जगी धन्य झाला तोची भक्त ॥ ५ ॥

(१३)

माझीया बोलाचा न करिल मोल।
होईल तोची झोल जन्मा येवूनी ॥ १ ॥
जन्मायेवूनिया पडेल नर्क खाणी।
भोगेल योनी सर्पाची तो ॥ २ ॥
ज्यानी ज्यानी मजसी केला उदंड पणा।
भोगेल यम यातना यमपुरी ॥ ३ ॥
यमपुरी त्याला यम मारतील।
कुंभीपाकी वास सदोदित ॥ ४ ॥
खोटें नाटे जाळे कोण्या जीवा प्रति।
होईल वाघुळ पुढच्या जन्मी ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे सत्य सत्य जाणा।
चुक तीं होईना माझी वाणी ॥ ६ ॥

(१४)

ज्याचे राम नामी ध्यान, त्याला कुठे नाही न्यून ॥ १ ॥
राम नामी रंगली वाणी, त्याचे सवे चक्रपाणी ॥ २ ॥
दया ठेवीं सर्व जीवा, त्याशी सांभाळी विठोबा ॥ ३ ॥
जैराम म्हणे ऐसे गुण, त्याचे पाशी देव जाण ॥ ४ ॥

(१५)

सर्व चिन्ता माझी तुज नारायणा, बाळाची प्रार्थना सांभाळ करी ॥ १ ॥

माझे प्रपंच सांभाळावे देवा, चीत्त शुद्ध व्हावे हे मागणे ॥ २ ॥
तुझे नांव माझे मुखी येवो सदा, परमार्थी बाधा पडू नये ॥ ३ ॥
माझे मन जाई ज्या ज्या ठिकाणी, मूर्ति राहो ध्यानी तुझी देवा ॥ ४ ॥
सर्व जिवा प्रति दया भाव राहो, द्वेष ना येवो माझे मनी ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे द्यावा ऐसावर, राही तूं निरंतर माझ्या ध्यानी ॥ ६ ॥

(१६)

चौऱ्याशिची फेरी सुटे नाही तुला, ऐक माझ्या बोला ध्यान देई । १ ।
ध्यान देई तुरे करण्या परमार्थ, तेव्हाच सार्थक तुझ्या जिवा ।२ ।
सार्थक मिळाल्याने काय मिळते फळ, जैराम म्हणे कुळ उद्धरती । ३ ।
उद्धरती कुळ भाव भक्ति योगें, आडमार्गी जनी जाऊं नये । ४ ।
चालू नये कुणी हरी वीण वाट, सुटे यम घाट मानवाचा ॥ ५ ॥
सुटे यम घाट दृढ या पंथानी, लागावे भजनी जैराम म्हणे ॥ ६ ॥
भजन केल्याने काय मिळे सुख, जन्माची ती दुःखे दूर होती ॥ ७ ॥
होती दुःखे दूर संताच्या संगत, जिवनाचे पाळणे तुटते ततक्षणी ॥ ८ ॥
करा नका कोणी खेचरी भुचरी आसन, नेहमी संताचरणी मन ठेवा ॥९ ॥
एक तत्व भाव करावे त्याची सेवा, मिळविण्या त्या देवा जैराम म्हणे ॥ १० ॥

(१७)

ज्याने कोणी केले पुरान पठन, अनायसे तिथे जान आत्मखूण ॥ १ ॥
खूण नाही मिळे गुरूचे वाचून, शरण ते जावें त्याचे जवळी ॥ २ ॥
त्यांचे जवळी जावूनी घ्यावे सोहं मंत्र, तेव्हां तुटती तंत्र मायेचे हे ॥ ३ ॥
मायेचे हे तंत्र भक्तिने तुटती, युक्ति दावीतील गुरूराव ॥ ४ ॥
जयराम म्हणे गुरू महिमा अगाध, सुटेल ऊपाधी जन्माची ती ॥ ५ ॥

(१८)

नाही किंमत बोलाची, कसी होईल भक्ति प्राप्ती ॥ १ ॥
बोलतो ते करत नाही, कसे कसे सत्य देईल ग्वाहि ॥ २ ॥

आहेस तुरे खरा मुर्ख, जन्मा येवोनी करी तर्क ॥ ३ ॥
हीत खोऊनी बैसला, दुःख होईल जिवाला ॥ ४ ॥
जन्मा येवूनी गर्व केला, त्यानें कसा होईल भला ॥ ५ ॥
सत्य धर्म विसरून गेला, दोष देशी प्रारब्धाला ॥ ६ ॥
जैराम म्हणे खरे ज्ञान, सत्य सत्य घे ओळखून ॥ ७ ॥

(१९)

प्रपंचाच्या पायी विटले हे मन, लागत नाही ध्यान तुझे चरणी ॥ १ ॥
तुझ्या चरणावीण सुख नाही या जिवा, केव्हां भेट देशी पांडुरंगा ॥ २ ॥
तुजवीण देवा झाले परदेशी, पडली आटाआटी, तुजवीण ॥ ३ ॥
तुजविण जगी कोण सुखी झाले, दावावी पाऊले ततक्षणी ॥ ४ ॥
ततक्षणी तुम्ही दावावी ती वाट, पुढे आहे घाट अवघड ॥ ५ ॥
आता तरी देवा कृपा मजवरी, जैराम म्हणे तारी पांडुरंगा ॥ ६ ॥

(२०)

मना तुरे धरी सज्जनाचा संग, तेव्हां होईल भंग कुंसगाचा ॥ १ ॥
आपुलिया हिता भुलूनिया गेला, येवुनी भुलला माया डोही ॥ २ ॥
करतोसी चिंता भलत्या कामाची, विसर पडली देवाजीची ॥ ३ ॥
सुख दुःख दोन्ही जरा न संगाती, त्यांची तया भिती ठेवूं नका ॥ ४ ॥
दुःखापासुनिया सुखाची उत्पत्ती, ऐक तूं प्रचिती पुढे त्याची ॥ ५ ॥
भोगने पडले दुःख प्रल्हादासी, रक्षुनिया त्यासी उद्धरिला ॥ ६ ॥
पांडवाचा छळ केला कौरवाने, बारा वर्षे फिरविले वनवासी ॥ ७ ॥
भक्तिचा विजय केला नारायणी, पांडवासी रणी विजयी केले ॥ ८ ॥
असे सांगू किती संताचे प्रमाण, न हो हे विधान खोटे कधी ॥ ९ ॥
जैरामदास म्हणे सोड अज्ञानाला, पीई गुरू प्याला निशीदीनी ॥ १० ॥

(२१)

सावधान व्हारे भरला सागर, तया मोठी पर आहे बाघा ॥ १॥

सागर भरला आहे माया रूपी, जीवनास सुखी रात्रंदिनी ॥ २ ॥
कोणी ना तरले हरी नामा विणा, साधु संत खुणा सांगताती ॥ ३ ॥
भाव भक्तिची बांधुनी सांगड, नापरूपी बैसा डोंग्यावरी ॥ ४ ॥
विवेकाची तुम्ही हाती घ्या डाई, उतरवील ही पैलतीरी ॥ ५ ॥
सागरांत असे नक्र जलचर, जीवन वाटोळे करतील ॥ ६ ॥
जैरामदास म्हणे हा भवसागर, गुरूवीण पार होणे नाही ॥ ७ ॥

(२२)

अहो भाग्य आम्हां नर देह दिला, कश्यासाठी आला बापा इथे ॥ १ ॥
कोणीतरी तुला सांगीतले सार, मग का फिरसी वेड्यापरी ॥ २ ॥
नाना योनी जन्म घेवुनी आलासी, बोध त्या मनाला देत नाही ॥ ३ ॥
क्षणमात्र त्याला नाही कोठे सुख, सर्व ठायी दुख उभे राही ॥ ४ ॥
सर्व ठायी तुजे जिवासी काळोबा, सोड माया लोभा अग्यानासी ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे विचार करी मनी, नाही रानी वनी देव तुझा ॥ ६ ॥

(२३)

नको मज मान नको अभिमान, तुझे चरणी मन राहो देवा ॥ १ ॥
नको मज गोत्र नको मज पुत्र, तुझे हाती सुत्र तारण्याचे ॥ २ ॥
नको देऊ शक्ती नको देवू युक्ती, नको मज मुक्ती पांडुरंगा ॥ ३ ॥
नको मज योग नको मज सोंग, तूझे नाम रंगी रंगु देवा ॥ ४ ॥
तुजवीन मज न दिसे तो डोळा, जिवीच्या जिव्हाळा पांडुरंगा ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे न कांही मागणे, मिळो तुझे चरण जन्मोजन्मी ॥ ६ ॥

(२४)

दुसऱ्याचा जीव घेवुनी करसी काय, रडसी हाय हाय यमद्वारी ॥ १ ॥
क्षणीक सुखांत भुलूनिया गेला, विचार नाही केला न्यायान्याय ॥ २ ॥
झालासि तूरे पोटोबाचा दास, देत असे त्रास जित्या जिवा ॥ ३ ॥
दगडाच्या देवा बकऱ्याचा जीव, कैसी येत नाही तुला कीव ॥ ४ ॥

खाणारांचा मेळा गोळा केला तुने, गळा तो कापी बकऱ्याचा। ५ ॥
मुलाचा तो नवस केला हौसीने, खासी तु मौजेनें मास त्याचे ॥ ६ ॥
जैरामदास म्हणे देसी देवा बळी, चुकेना तातडी बदला त्याचा ॥ ७ ॥

(२५)

संकटाचे वेळी कामा जो येई देव तोच होई तोची एक ॥ १ ॥
धरूनीया भाव मनी बळकट, सोडविना वाट त्यांची बापा ॥ २ ॥
चालता बोलता कर्मासी करता, नीत्य आठवा त्याचे नाव ॥ ३ ॥
जगासाठी तोची असेल वाईट मनी ठेवूं नये वीट त्याचा ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे तोची सखा, संकटांत सहारा तोची जगी ॥ ५ ॥

(२६)

संकटाचे वेळी येई जो धावून, तोची नारायण ध्यानी घ्यावा ॥ १ ॥
संकटाचे वेळी जो कामी पडला, आपुला तो झाला माता पिता ॥ २ ॥
तोची एक जाणा माता पिता बंधु, तारक तो सिंधु भवडोही ॥ ३ ॥
जगासाठी जरी असो दुराचारी, जाणावा तो हरी आपला तो ॥ ४ ॥
भावे बळकट धरावे चरण, प्राण गेला तरी विसरू नये ॥ ५ ॥
करूनियां प्रपंच परमार्थ साधी, जन्माची उपाधी जाई त्याची ॥ ६ ॥
ऐसीया मार्गानें जो कोणी जाईल, धन्य तो होईल जैराम म्हणे ॥ ७ ॥

(२७)

संताचे दर्शना जारे माझ्या मना, नाहीं तर पाहूणा यमाचा तो ।१ ।
संताचे ते बोल ऐक माझ्या मना, तुटण्या बंधन जीवनाचे ।२ ।
संत चरणाची धूळ घेई शिरी, पाप नाश करी क्षणामध्ये ।३ ।
संताचे ते बोल करु नको फोल, होईल तुझे मोल जगामध्ये ।४ ।
संत चरणाचा नको वैर भाव, जैराम म्हणे देव आहे तिथे । ५ ।

(२८)

संताचे घरचा असे स्वान, पवित्र तो जान संगतीने ।

संताचे घरचा जरी असे नोकर, जाणा परमेश्वर आपने मनी।
संताचे घरची असे केरसुणी, बनवितसे ज्ञानी अज्ञानासी ।
संताचे घरची असली जरी गाय, नेत असे माय मोक्षाव्दारी।
संताचे घराचे झाले दर्शन, मन शांत प्रसन्न होत असे।
जैरामदास म्हणे किती वर्णू महिमा, येईल त्याच्या कामा जाणे वर्म।

(२९)

नाही आठविला राम जन्मासी येवूनी, दुःखासी कारणी जन्म तुझा। १।
प्रपंचाचे पायी जन्म व्यर्थ तुझा, जाग बापा आता स्वहिताला। २।
जगांत येवूनी भूललासी प्राण्या, सारा वेळ व्यर्थ गमविला। ३।
माझे माझे म्हणोनि घांत केला, काय बा होईल पुढे तुझे। ४।
सांडूनी कल्पना जा गुरु शरणी, साधी तु मनाला जैराम म्हणे। ५।

(३०)

ज्याने देवा कडे जावे, त्याने बहु लीन व्हावे ।१।
सोडुनिया व्देषभाव, एक मानी सर्व जीवा। २।
असा ध्यास नित्य ठेवा, जळी तळी देवा पाहा। ३।
संबंध जुळे निसर्गासी, अुने नाही कुठे त्यासी ।४।
तत्व तत्वी लीन व्हावे, शिव जिवात पाहावे ।५।
मग तुटे येणे जाणे, हेची स्वहिताचे लेने। ६।
जैराम म्हणे आत्मखुण, ओळख करा अनुभवाने। ७।

(३१)

वाईट कल्पना सोडूलिया मना, गुरुच्या शरना शिघ्रजाई ।१।
याच देही डोळा पाही देवरुप, सर्वाठायी ईश भरला आहे ।२।
आशा, तृष्णा, मनसा, ओढाळ वासना, जाळुनिया यांना शुद्धकारी। ३।
भ्रम आणि भ्रांती करुनिया दूर, पाहावे माहेर निवृत्तीचे। ४।
लोभाशी मारावे मोहाशी त्यागावे, अहंकारा जाळावे ततक्षणी। ५।

काया वाचा मन करनिया बळकट, करावे भजन गाढ-वाचे । ६ ।
भाव आणि भक्ति लागावे ते लग्न, तुडतील विघ्न जन्मांतरीचे । ७ ।
जैरामदास म्हणे मार्ग हा बिकट, सदगुरुवीण वाट मिळत नाही । ८ ।

(३२)

तुझा जन्म झाला निवृत्तीच्या पोटी, लागला तुं पाठी प्रवृतीच्या । १ ।
सोडूनी स्वहित केलासे तु घात, झाला तुरे दास मायेचा तूं । २ ।
खऱ्याला तू खोटे खोट्याला तू खरे, म्हणून सैरावैरा फिरतोसी । ३ ।
माझे माझे म्हणूनी गर्वात थाटला, क्रोधाने बाटला ठेवा तुझा । ४ ।
करुनी खोटे काम विसरला ते धाम, लागला तो यम तुझे पाठी । ५ ।
जैरामदास म्हणे खोट्या कर्मफळ, म्हणुनिया रड जन्मोजन्मी । ६ ।

(३३)

देवा आम्ही सर्व संसारी बा जीव, कसे भवसिंधु पार व्हावे । १ ।
कळेना अज्ञाना तुझे हे वर्म, कैसे जपू नाम तुझे देवा । २ ।
कसे यावे तुझ्या सांग महाव्दारी, सुचेना मुरारी मज काही । ३ ।
बुडतसो आम्ही मायेच्या सागरी, भक्ताचा कैवारी तूची देवा । ४ ।
कसे लावावे चेदन, कसे करावे वंदन । ५ ।
कोण्या ठायी ठेवी भाव, तोची मज मार्ग दावा । ६ ।
कुणाचा घेऊनीया आधार, कोण सांगील मज सार । ७ ।
जैराम म्हणे गा केशवा, तुजवीना ना विसावा । ८ ।

(३४)

संताचे बोलाचा जो करी अपनाम, त्याला नाही ठिकाण तिन्ही लोकी । १ ।
तिन्ही लोकी नाही लागत त्याला थारा, फिरतो सैरावैरा वेड्यापरी । २ ।
कोण्याठायी त्याला मिळत नाही मान, दुःख अपनाम नित्य भोगी। ३ ।
भोगीतसे फळ वाईट कर्माचे, भूत सदा नाचे डोक्यावरी । ४ ।
होअुनी हैरान जरजर तो झाला, जीवन व्यर्थ गेले अहंकारे । ५ ।

जैराम म्हणे संत बोल ना ऐकला, नरकात पडला जन्मोजन्मी । ६ ।

(३५)

ऐसे बोल बोला तुम्ही, येवो सर्वांच्या तो कामी ।१।
व्यर्थ शब्द ना तो जाई, हित सर्वांचे ते होई । २ ।
जन करती प्रेम भावे, ऐसे शब्द आचरावे । ३ ।
कोणा नये त्याचा वीट, नेहमी जुळो सर्वा प्रित ।४।
ऐसे नियम मनी धरा, जगी नाही वैरी त्याला । ५ ।
जैराम म्हणे सत्यवाणी, नेई मोक्षाच्या ठिकाणी । ६ ।

(३६)

एक शब्द जाना हीतकारी, अेक शब्द नेईल नरकद्वारी । १ ।
शब्दा पासुनिया जगाचा व्यवहार, चालतो संसार त्याचे मागे । २ ।
त्याचे पासुनिया जीव हा बांधला, शब्द ओळखिला तेव्हा सुटे । ३ ।
राजा हरिचंद्र शब्दात बांधला, राजा पाट दिला विश्वामित्रा । ४ ।
शब्दापाई राम वनांमध्ये गेले, दुःख भोगिले चौदा वर्षे । ५ ।
सत्यापासूनिंया मिळे सत्या फळ, नाहीं त्याचे जवळ काळ येई ।६ ।
जैरामदास म्हणे शब्दाशी ओळखावे, मोक्षपद मिळे तत्क्षणी । ७ ।

(३७)

शब्दाशब्दाची करा जुळवणी, पाहा चक्रपानी आपले डोळा । १ ।
सोडोनि कल्पना अभिमान सारा, लिनतेच्या व्दारा नेहमी जावे । २ ।
लिनतेच्या पायी मिळे जिवा शांती, फिरे तेव्हां भ्रांती जन्मोजन्मीची । ३ ।
जिवशिव दोन्ही एकरुप झाले, माझा मी विसरलो मी तुं पणा । ४ ।
सर्वाठायी दिसे ब्रम्हरुप डोळा, विश्वाचिया घरा पाहुनिया । ५ ।
आनंदी आनंद आनंदाचा कंद, चोही बाजु गोविंद भरुन उरला । ६ ।
जैराम म्हणे आत्मा साक्षी घ्यावे, मिळूनियां जावे शब्दांमध्ये । ७ ।

(३८)

शब्दांत मिळाल्याने काय मिळे फळ
धावून येतो घननिळ त्याचेसाठी ॥ १ ॥
अहर्निशी उभा त्याचे पाशी राही,
बाळा परी आई पालणकरी ॥ २ ॥
किती जरी संकटे त्याचे वरी येई
लावतसे सोई देव त्याचे ॥ ३ ॥
घेऊनी काळजी सर्व परी देव,
करि देवघेव भक्ता घरी ॥ ४ ॥
देव घेव करी सोडूनि वैकुंठ,
भक्ताचा तो दास होऊनियां ॥ ५ ॥
गोऱ्या कुंभाराचे मडके त्यानें केले,
ढोर ते ओढले घोखोबाचे ॥ ६ ॥
ऐसा तो कैवारी भक्तापाशी उभा,
भक्ताला तो शोभा आणितसे ॥ ७ ॥
जैरामदास म्हणे शब्दाने बांधावे,
नामानें कोंडावे हृदयस्थानी ॥ ८ ॥

(३९)

लोक झाले कैसे वेडे, नाही कळे सत्य घडे ॥१ ॥
करती सतपुरुषाची छेडी, म्हणून नाही अन्न घरी ॥ २ ॥
अन्नासाठी दारोदारी, म्हणूनि झाले ते भिकारी ॥ ३ ॥
सोडुनिया अपुले हित, कुमार्गासी लावती प्रीत ॥ ४ ॥
बापा येऊनी जन्माला, हित नाही ओळखिला ॥ ५ ॥
करी भलत्याची पूजा, अंतरी देव झाला दूजा ॥ ६ ॥
चुकले वर्म कर्म सारे, म्हणूनि फिरती व्यर्थ फेरे ॥ ७ ॥
जैराम म्हणे आंधळे, जन, खरा मार्ग गेले भूलून ॥ ८ ॥

(४०)

नामाविन सुख नाही, नाम नेई मोक्ष ठाई ॥ १ ॥
नामाविन जिणें व्यर्थ, मनी लावो त्याचा अर्थ ॥ २ ॥
नामाविन बोलू नये, नामाविन चालू नये ॥ ३ ॥
घेवोनिया मुखी नाम, मिळे कांमात विश्राम ॥ ४ ॥
अहर्निशी घ्यावे नाम, सोडूनिया वाईट कर्म ॥ ५ ॥
जैराम म्हणे नाम महिमा, जाणे त्याचे आला कामा ॥ ६ ॥

(४१)

नाम घेता काम करी, उभा कामांत श्रीहरी ॥ १ ॥
नामाने ते पतित तरले, जन्मा येवूनी उद्धरले ॥ २ ॥
नाम भरले सर्व ठाई, ओळखी करा लवलाही ॥ ३ ॥
नामाने कोन वाया गेले, अंती हरी रुप झाले ॥ ४ ॥
नाही काळ वेळ त्यासी, नाम जपे अहर्निशि ॥ ५ ॥
सर्व काम ब्रम्ह मुहुर्त, जेजे करी शुभ होत ॥ ६ ॥
ज्याचे पाशी नाम आहे, त्याला काळाचे ना भय ॥ क्ष ॥
जैराम म्हणे नाम जपा, चुकती चौऱ्यांशीच्या खेपा ॥ ८ ॥

(४२)

मनी घरा नाम तुम्ही बळकट, सुटेल खटपट जिवनाची ॥ १ ॥
जरी संकट येवो किती तरी तुम्हा, मुखी हरी हरी उच्चारावे ॥ २ ॥
धैर्य सोडुं नये प्राण गेला तरी, वचन ना तोडी सत्य अेक ॥ ३ ॥
जेजे दुःख झाले ते ते हरिकृपा, आनंद तो सुख मानुनी घ्यावे ॥ ४ ॥
सोडु नये कर्म नित्य नियमाचे,दुःख प्रारब्धाचे पाहुं नका ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे निर्भय होऊनि, नामासी ततक्षणी तूं भुलू नको ॥ ६ ॥

(४३)

तरण्याची वाट आहे नामापाई, मुखी नाम वेळोवेळी ॥ १ ॥

सोडूनि कल्पना सारी भांडवल, नामा वीण मोल कोन करी ॥ २ ॥
नामाचे प्रतापे पाषाण तरले, काम पूर्ण झाले सर्वांचे ते ॥ ३ ॥
रामापेक्षां नाम जगी आहे श्रेष्ठ, सोड्डु नको वाट नामाचीया ॥ ४ ॥
बसले ज्याचे चित्त दृढ नामाप्रति, मग काय भिती संसारात ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे ओळखी करा नाम, अंतरी घनश्याम पाही डोळा ॥ ६ ॥

(४४)

नाम तारी नाम मारी, नाम सर्वांचा कैवारी ॥ १ ॥
नित्य नियमी जपे नाम, जिवा मिळे रे विश्राम ॥ २ ॥
नाम दिसे ते फुकट, घेणें आहे रे बिकट ॥ ३ ॥
आधी मन हाती धरा, काम क्रोध बकरा मारा ॥ ४ ॥
दया शांती पाशी जावे, लोभ मोहासी त्यागावे ॥ ५ ॥
मद मत्सर जळावे, क्षमा हृदयी धरावे ॥ ६ ॥
ज्याचे पाशी ऐसे गुण, त्याचे पाशी नारायण ॥ ७ ॥
तप केले रावणानें सिद्ध केले नाम त्यानें ॥ ८ ॥
मनी ठेवूनी छल कपट, जन्म त्याचा गेला व्यर्थ ॥ ९ ॥
जैराम म्हणे सोडा संशय, नाम घेवुनी काढा भय ॥ १० ॥

(४५)

जन हे स्वार्थाचे प्रेमी, वेळ पडे येती धावोनि ॥ १ ॥
वेळ निघे जाती भुलोनी, कधी आठवी ना मनी ॥ २ ॥
ज्याचे पासुनि मिळाले सुख, बैमान होती असे लोक ॥ ३ ॥
सोडुनिया इमानदारी, झाला खऱ्याचा तो वैरी ॥ ४ ॥
म्हणती अुलट काय केले, माझा मीच पूर्ण केले ॥ ५ ॥
गेले भुलोनी उपकारा, अपकाराने पेश आला ॥ ६ ॥
जैराम म्हणे, जनरित, कामापुरती ठेवती प्रीत ॥ ७ ॥

(४६)

आपत्तिची आली वेळ, सर्व रडती धडधड ॥ १ ॥

देव आता सांभाळकरी, तुजवीन ना कैवारी ॥ २ ॥
आग्रह करती केवीलवाणी, आम्हां काढा संकटातूनी ॥ ३ ॥
उपकारा कधी ना भूलिन, नित्य ध्यान तुझे ठेवीन ॥ ४ ॥
जो वरी माझा प्राण राही, कधी विसरणार नाही ॥ ५ ॥
दया आली त्या देवाला, धावूनी संकट दूर केले ॥ ६ ॥
दुःख दूर झाल्यावंवी, त्याचवेळी भुलले हरी ॥ ७ ॥
जैराम म्हणे जन रीत, म्हणूनि झाली ऐसी गत ॥ ८ ॥

(४७)

संताचे बोलाचा ठेवी मनी वैर, त्याला नाहीं थार जगा मध्ये ॥ १ ॥
नित्य संताचा करीं जो अपमान, दुःख तो महान भोगीतसे ॥ २ ॥
प्रोत्साहन देई संत निंदे मध्ये, पुढे नर्कवास त्याचे साठी ॥ ३ ॥
संताचे वस्तुची करी जो धुळधान, फळ मिळे त्याशी तत्क्षणी ॥ ४ ॥
संताच्या शरिराला देई कोणी त्रास, होतो त्याचा नाश जन्मोजन्मी ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे खरे समजा बोल, मानुं नका फोल या गोष्टीचा ॥ ६ ॥

(४८)

संताच्या शब्दाचा ठेवी प्रेमभाव, त्याचे सवे देव नित्यराही ॥ १ ॥
संताच्या बोलाचा मनी नाही वीट, मिळे त्यासी वाट परमार्थाची ॥ २ ॥
संत चरनाची नित्य करी सेवा, पुण्याचा तो ठेवा जन्मोजन्मी ॥ ३ ॥
संताचे शब्द श्रवण जो करी, जिवन उद्धरी त्याचे बापा ॥ ४ ॥
संत दर्शनाची असे ज्याला गोडी, देहाची पासोडी शुद्ध होई ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे हाची मार्ग खरा, नेतो मोक्षद्वारा मानवाशी ॥ ६ ॥

(४९)

ज्याचे ज्यानें बरे केले, अंती बेईमान ते झाले ॥ १ ॥
सोडले त्यानें आपुले हीत, खोट्या जना लावी प्रीत ॥ २ ॥
मनी विचार नाही केला, निंदक त्याचा तो बनला ॥ ३ ॥

करी निंदा रात्रंदिवस, बैसुनिया कुसंगतित ॥ ४ ॥
जन्म व्यर्थ त्यानें केला, डोई धरले पापाला ॥ ५ ॥
विसरला जो खऱ्याशी, जैराम म्हणे पुढे चौऱ्यांशी ॥ ६ ॥

(५०)

मन दृढ करूनि जो जो कर्म करी साह्य होतो हरी त्याचे साठी ॥ १ ॥
पाहोनिया भाव येतो यदुराव, भक्तिचिया सेवे कामेकरी ॥ २ ॥
काम करी त्याचे होऊनी चाकर, सोडूनी फिकीर वैकुंठाची ॥ ३ ॥
आपुलीये हाती घेई जे जे काम, भक्ताला मदत देव करी ॥ ४ ॥
ऐसा तो दयाळू भक्त हितकारी, ब्रिद तो सांभाळी अहर्निशी ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे एक भाव चित्त, त्याच्यांत राहतो निरंतर ॥ ६ ॥

(५१)

निती नियमावीन जगी जिणे व्यर्थ,
प्रपंचाचा अर्थ करूनि चाला ॥ १ ॥
करावा व्यवहार दोष लागूं नये,
विचाराने ठेवा पाऊल पुढें ॥ २ ॥
क्षणोक्षणी मनी आत्मसाक्षी घ्यावी,
वाचा ती बोलावी सार मिळे जेणे ॥ ३ ॥
ऐसा जो नियम बळकट धरी,
राहुनि संसारी बाधा नाहीं ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे वागा येणें परी,
कामात तो हरी पाही डोळा ॥ ५ ॥

(५२)

काम करावे ते नीट, कोणा नये मनी वीट ॥ १ ॥
ऐसी बोलावी ती वाणी, जन ठेवी अपुले मनी ॥ २ ॥
तिचे पासून मिळे फळ, होई जिवाचा उद्धार ॥ ३ ॥

करूनि प्रपंच परमार्थ, लावी दोन्हीचा हा अर्थ ॥ ४ ॥
ऐसे साधन तुम्ही करा, देव होईल सोयरा ॥ ५ ॥
जैराम म्हणे करा विचार, खोरू नका ऐसी वेळ ॥ ६ ॥

(५३)

स्वहिताचा बोल प्रेमपणें बोल, जेणें होईल मोल जगामध्ये ॥ १ ॥
आत्मसाक्षी ठेवूनि करावे ते काम, मिळतसे विश्राम प्रपंचात ॥ २ ॥
मनाला नियंत्रुन करावे भजन, भुलूनियां घ्यावे या देहासी ॥ ३ ॥
पाहुनियां तेव्हां अंतरिचा रंग, जीव होतो दंग त्याचठायी ॥ ४ ॥
डोळीयांचा डोळा अंतरी उगवला, तत्वामध्यें तत्व विलीन झाले ॥ ५ ॥
सोडहं हा शब्द वाचेसही खुंटला, आकाशी मिळाला ब्रम्हांनदी ॥ ६ ॥
जिव शिवांशी जावूनियां मिळाले, अहंब्रम्ह अुगवले त्याचे पोटी ॥ ७ ॥
मग येथे नाही मी तू पण कांही, जैराम देई ग्वाही अनुभवाने ॥ ८ ॥

(५४)

तुम्हीं सगुन निर्गुणाचे खेळ,
जानेल तो बाळ सदगुरूचा ॥ १ ॥
अष्ट तो धातुचा बनविला पिंजरा,
जीव हा पोपट बसला आहे ॥ २ ॥
वाणी त्याची निघे सोडशब्दाहं ची,
भिती ना काळाची तयालागी ॥ ३ ॥
सोऽहं म्हणता कोऽहं मुखी आला,
पिंजऱ्यात अडकला पोपट तो ॥ ४ ॥
नव ते दरवाजे असतो पिंजऱ्याला,
आनंदी रमला दसव्यांत तो ॥ ५ ॥
बिरलाही जाणे गुज तिथल्या गोष्टी,
गुरूवीन कष्ट पोपट तेथें ॥ ६ ॥

पाहा पिंजऱ्याला बावन असे पट्टी,
छत्तीस ते मोती झळकत आहे ॥ ७ ॥
ज्ञान हे शक्ति त्याचे असे पट्टी,
बाप सदा पाही सदगुन तो ॥८॥
बुद्धी चित्त भाऊ पोपटाचे असे,
सुरता ती बहीन त्यांचे सवे ॥ ९ ॥
बनविल विस्वाचा रज गुण काका,
काही नियम क्रिया हाकामारी ॥ १० ॥
दश इंद्रियाचा करूनि अेकमेळा,
उच्चारी वेळोवेळी आत्माराम ॥ ११ ॥
ऐकोनियां किव़ आले तेथे शिव,
घेवूनियां गेले कैलासांत ॥ १२ ॥
गुरूवीण भेद पिंजऱ्याचा न कळे,
पोपट तो रडे पिंजऱ्यामध्ये ॥ १३ ॥
सोडण्याची किल्ली असे गुरूपाशी,
जैराम म्हणे गुरू शरन जावे ॥ १४ ॥

(५५)

जो आपलेसाठी झिजे, त्याचे जावे तुम्ही काजे ॥ १ ॥
मनी धरू नका संशय, करा काम निर्भय ॥ २ ॥
जोडोनि सबंध बळकट, ठेवावे व्यवहार चोखट ॥ ३ ॥
दया भाव अंतरी ठेवा, एक दुसऱ्यास साह्य घ्यावा ॥ ४ ॥
असा मार्ग तुम्ही धरा, न लागो अहंकाराचा वारा ॥ ५ ॥
जैराम म्हणे देव उभा, तेथे काय स्वर्ग शोभा ॥ ६ ॥

(५६)

निवृत्तीचे पोटी जन्मले ते त्याग,

मारले ते लोभ त्याचठायी ॥ १ ॥
दुसरे ते पुत्र वैराग्य हे जाणा,
मना धरून आणा आईपाशी ॥ २ ॥
तिसरा मुलगा साच असे तो ज्ञान,
मारी ततक्षणी अज्ञानासी ॥ ३ ॥
चवथा हा मुलगा जाणावा विचार,
कुकर्मासी मारे वेळोवेळी ॥ ४ ॥
पांचवा विवेक जाण हाची पुत्र,
नेई तो जिवाला भक्तीपाशी ॥ ५ ॥
पहली मुलगी जाणावी ती बुद्धी,
भ्रांतीशी ती भेदी मृदंगानी ॥ ६ ॥
दुसरी मुलगी जाणा साच ती शांती,
क्रोधावरी क्रांति करीतसे ॥ ७ ॥
तिसरी मुलगी दिसे जाणावी ती क्षमा,
मुक्तिच्या त्या धामा पोचवितसे ॥ ८ ॥
जैरामदास म्हणे निरंजनपुरी गेलो,
स्वरूपी मिळालो निवृत्तीच्या ॥ ९ ॥

(५७)

असे जरी विद्वान आपुल्या कामाचा, केले ना जनाचे हित कधी ॥ १ ॥
दिन दुबळ्याची मुळी नाहीं दया, धन द्रव्यांत माया ठेवी ॥ २ ॥
कर्म धर्म सारे भुलोनिया गेला, गर्वात थाटला ज्ञानापायी ॥ ३ ॥
पाप पुण्य काय मनी विचार न ये, अज्ञानात राही सदोदित ॥ ४ ॥
जन्मा येऊनी देह ना झिजवी, स्वहित ना साधीले अपुले त्याने ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे ऐसे खोटे ज्ञान, होईल शिकून काय भले ॥ ६ ॥

(५८)

चिंता चिंता सर्व जना, कोण देई शांतवना ॥ १ ॥
कोणी अन्नाविण भुकी, कोणी पुत्राविन दुःखी ॥ २ ॥
कोना रोगाने ग्रासिले, कोना राहण्या न ठिकाणे ॥ ३ ॥
कुनी दंग भांडणांत, कुणी कोर्ट दरबारांत ॥ ४ ॥
ऐसे सर्व दुःखी दुःखी, कुणी येथे नाही सुखी ॥ ५ ॥
सुख संत चरणा पाशी, दुःख ना होई जिवाशी ॥ ६ ॥
जैराम म्हणे जीवा थारा, संत जिवाचा सोयरा ॥ ७ ॥

(५९)

आधि वाल्मिकाने, रामायण लिहले, मग रामचंद्र जन्मा आले ॥ १ ॥
कविचे कवित्व असे त्रिकालदृष्टी, दर्शविते गोष्टी भविष्याचे ॥ २ ॥
त्यांचे या वाणीने वेद निर्माण झाले, जडजीव तरले त्याचे पायी ॥ ३ ॥
मानवाचे धर्म कर्म ते कोणते, जेणे होई उद्धार जिवनाचा ॥ ४ ॥
निती नियम क्रिया, दया क्षमा शांती, काढण्याची भ्रांती गुरुदावी ॥ ५ ॥
सगुणांचे ध्यान निर्गुणांत जाणे, आपल्यांत पाहणे निरुपण ॥ ६ ॥
तत्व स्वर ज्ञान अनुभवी खुण, सतरावीचे स्थान दर्शविले ॥ ७ ॥
जगाचा हा शोध कविने लाविला, सर्वांत दाविले नाम त्याचे ॥ ८ ॥
जैरामदास म्हणे तेची देव जाना, सृष्टीची रचना त्याचे मनापासून ॥ ९ ॥

(६०)

गेले भुलूनिया धनी आणि ज्ञानी, दाटले अभिमानी द्रव्यापायी ॥ १ ॥
भुलूनिया गेले सत कर्तव्यासी, झाले ते बैमान देवाजीसी ॥ २ ॥
अभिमान यांना मानसन्मानाचा, मनी ना देवाचे नाम जळे ॥ ३ ॥
किव नाही यांना परक्या जिवाची, आपुल्या हिताची जाणीव असे ॥ ४ ॥
जेथे तेथे सर्व माझे माझे पाही, डौलात तो राही मायेचिया ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे कैसे यांचे गुण, गेले ते भुलून स्वहिताशी ॥ ६ ॥

## (६१)

लावू नका खोटे पाप, भोगाल पुढे मोठे दुःख ॥ १ ॥
सोडूनिया धर्म निती, पुढे होईल दुर्गती ॥ २ ॥
कर्म धर्म अंगी नाही, ब्रम्हज्ञान लोकांना सांगी ॥ ३ ॥
बोलतो तसे चालत नाही, त्याने काय सुख होई ॥ ४ ॥
जितके आपण करावे, ते ते लोकांना सांगावे ॥ ५ ॥
जैराम म्हणे वाईट कोण, शोधून पहा अपुल्या मना ॥ ६ ॥

## (६२)

जे जे असे दैवी भोग, त्याला टाळी कोणी मग ॥ १ ॥
ज्ञानी असो वा चतुर, भोगी कर्माचे ते फळ ॥ २ ॥
चुकले नाही देवादिका, झाला देव जरी सखा ॥ ३ ॥
दुःख आले आपुले शीरी, सर्व सोसावे अंतरी ॥ ४ ॥
काय म्हणावे कोनाशी, आपण राहावे संतोषी ॥ ५ ॥
दोष आपलेच म्हणावे, आनंदे सोसून घ्यावे ॥ ६ ॥
जैराम म्हणे खरे कर्मा, सोडावे न आपल्या धर्मा ॥ ७ ॥

## (६३)

सुख दु:खात आनंद राहावे, देवाशी न भुलावे कदाकाळी ॥ १ ॥
जे जे असतील भोग प्रक्तनाचे, तेथे बा कोणाचे काय चाले ॥ २ ॥
सर्व सत्ता असे देवाचिया हाती, तेथें ना कोणाची चाले शक्ति ॥ ३ ॥
अज्ञानी जिवाशी अभिमान मोठा, देवाचिया सत्ता समजत नाहीं ॥ ४ ॥
धन द्रव्य सर्व आम्ही कमावले, साह्य नाहीं केले कोणी आम्हां ॥ ५ ॥
खरे ज्यानें दिले भुलून त्या गेला, बैमान तो झाला द्रव्यापायी ॥ ६ ॥
जैरामदास म्हणे असे खोटे लोक, काय होईल सुख आम्हां त्यांचे ॥ ७ ॥

## (६४)

ज्याचे पाशी सत्य कर्म, त्याचेवरी ठेवा प्रेम ॥ १ ॥

दृढभाव ठेवी प्रिती, विसर पडो ना कदापी ॥ २ ॥
धरा संग तुम्ही त्याचे, बनवा ताईत गळ्याचे ॥ ३ ॥
आले जरी संकट भारी, तरी त्याचा संग ना सोडी ॥ ४ ॥
प्राण गेला तरी जावूं दे वचन अंतरी राहूं दे ॥ ५ ॥
ऐसा भाव अंतरी ठेवी, देव साह्य तेव्हां होई ॥ ६ ॥
जैराम म्हणे खरा धर्म, आणि आचरणांत कर्म ॥ ७ ॥

(६५)

असे कर्म ज्याचे खोटे, संगतीने होई तोटे ॥ १ ॥
अंगी असे सत्वगुण, येती संगतीने दुर्गुण ॥ २ ॥
अज्ञानाला संग केला, ज्ञानी नाडुनियां गेला ॥ ३ ॥
परस्त्री संगे वाली गेला, राम बाणें मृत्यु आला ॥ ४ ॥
सीता रावणाने नेली, त्याची अधोगती झाली ॥ ५ ॥
कावळा बगळा तो झाला, लोभापायी प्राण खोविला ॥ ६ ॥
जैराम म्हणे हे लक्ष्मण, त्याशी वंदावे दुरून ॥ ७ ॥

(६६)

पाहुं नका कोणी पाप्याचे मुख, त्याचे काय सुख तुम्हांस ते ॥ १ ॥
पाप्याचे ते बोल नका धरूं कानी, होई तुझी हानी जन्मा येवूनी ॥ २ ॥
पाप्याचे ते थाट पाहुं नको डोळा, होईल वाटोळे जिवनाचे ॥ ३ ॥
पाप्याचे कामात लावूं नको मन, होईल तुझा गुण नाश त्याने ॥ ४ ॥
जैराम म्हणे आता विचार तूं करी, ठेवी तु अंतरी या गोष्टी ॥ ५ ॥

(६७)

शुद्ध नाही खाणी बाणी, कैसा म्हणावे त्याशी ज्ञानी ॥ १ ॥
रहण सहण नाही अंगी, कसा म्हणावा सत संगी ॥ २ ॥
नाही त्याग ते वैराग्य, कैसे साधेल त्या योगे ॥ ३ ॥
ज्याचे स्थिर नाही मन कैसे साधेल त्याशी ध्यान ॥ ४ ॥

नाही दया भाव शांती, कैशी येईल देव प्रचिती ॥ ५ ॥
पर जीवा नाही किव, कैसा मिळेल यदुराव ॥ ६ ॥
जैराम म्हणे कैसा ज्ञानी, नाही अंगी करणी भरणी ॥ ७ ॥

(६८)

राम नाम मुखी मना, कामी येईल जीवना ॥ १ ॥
मुखी आले राम ज्याचे, कुळ अुद्धरिले त्याचे ॥ २ ॥
अुने मग नाहीं त्याला, करूण देव तो आपुला ॥ ३ ॥
जगी त्याचे भाग्य जागले, देहांत त्यानें देव पाहिले ॥ ४ ॥
होवुनी देवांत निमग्न, विश्वाचा घेई स्वानंद ॥ ५ ॥
जैराम म्हणे याच जन्मी, गेला जगी किर्ती ठेवूनी ॥ ६ ॥

(६९)

ज्यानें देवाशी ओळखिले, त्याचे जीवन सुखी झाले ॥ १ ॥
मग नाहीं त्याला भिती, करी कोण निंदा स्तुती ॥ २ ॥
धरला ज्याने खरा मार्ग, कोणा येवो वीट राग ॥ ३ ॥
न सोडी तो आपुला हट्ट, कोणी मारो किंवा कापो ॥ ४ ॥
झाला असे जो निर्भय, मग काळ करील काय ॥ ५ ॥
सोडुनि जगाची ती लाज, करी देवाजीचे काज ॥ ६ ॥
जैराम म्हणे भाव ऐसा, देव होई त्याचा सखा ॥ ७ ॥

(७०)

शंका ठेवू नको मनी, जाईल काळ घेवूनी ॥ १ ॥
लावूं नको खोटे तर्क, पुढे मिळे तुला नर्क ॥ २ ॥
नको ठेवूं कुणा डोळा, होसी जन्माचा आंधळा ॥ ३ ॥
करूं नको खोटी निंदा, होईल जन्माचा चेंदा ॥ ४ ॥
सोडू नको धर्म निती, पुढे मिळेल वाईट गती ॥ ५ ॥
धरी सज्जनाचा संग, जिवन लावी पांडुरंग ॥ ६ ॥

जैराम म्हणे हाची धर्म, ओळखी आपुले खरे वर्म ॥ ७ ॥

(७१)

आता तरी जागे व्हारे, दिवस झोपीत गेले सारे ॥ १ ॥
आयुष्याची वेळ निघेल, तुला संग कोन देईल ॥ २ ॥
कोण तुझ्या सवे येईल, कोन तुला सांबाळिल ॥ ३ ॥
मनी करी तुं विचार, खोट्यांत नाही मिळे सार ॥ ४ ॥
ज्याचे करतोसी हित, पुढे तोच करी घात ॥ ५ ॥
जैराम म्हणे साधी वेळ, पाठीमागे आहे काळ ॥ ६ ॥

(७२)

राम नामाविन जगी जिने व्यर्थ, खोवूं नको वेळ नरजन्माची ॥ १ ॥
साधुन घेई बापा संत समागमी, येईल तो कामी अंतःकाळी ॥ २ ॥
सुवर्ण ही संधी भाग्याने लाभली, सतगुरू माऊली पाहण्यासी ॥ २ ॥
खोवू नका वेळ न पुढें येणार, जीव हा जाणार काळाहाती ॥ ४ ॥
तुज सोडणार कोण आहे जगी, बापा मायालागी भूललासी ॥। ५ ॥
भूलूनिया गेला संसारी येवूनी, गुरूवीन जगी नाहीं तुझा ॥ ६ ॥
जैरामदास म्हणे करी तुं विचार, सर्वांचा व तरि देव अेक ॥ ७ ॥

(७३)

काम ते आमुचे असे देवापाशी, रुसुन तुम्हासी काय मिळे ॥ १ ॥
आमची कराल तुम्ही आता छेडी, जन्मोजन्मी बेडी पायी तुमच्या ॥ २ ॥
खोटे जरी जाल टाकाल अंगावरी, भोगाल यमपुरी नरकवास ॥ ३ ॥
खऱ्याचे उलट भाषण घ्याल तुम्ही, बैलाची योनी तुमचे करता ॥ ४ ॥
दुसऱ्याचे जिवाला त्रास द्याल जरी, पडाल नर्कद्वारी रौरवांत ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे खोटे ना होणार, करारे विचार आपुले मनी, ॥ ६ ॥

(७४)

निंदक तो राहो आमुच्या शेजारी, हित नित्य करो जिवनाचे ॥ १ ॥

कपड्याच्या डागास साबुनाची वडी, देहाची पासोडी शुध्द करी ॥ २ ॥
करि सर्व शुध्द, आमुचे ते पाप, हरतो त्रिताप त्याचे पासुनी ॥ ३ ॥
असो तो नेहमी समोरची उभा, दुर्गुणांची शोभा तोची एक ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे निंदक असावा, पाप ते काढावे त्याचे बोला ॥ ५ ॥

(७५)

कर्म तुझे असे खोटे, जन तुला वाईट दिसे ॥ १ ॥
जसे असे तुझे मन, पाहसी आपुले समान ॥ २ ॥
अंगी असे खोड दुष्ट, धरशी जनांचा रे वीट ॥ ३ ॥
पाप पाही तुझे डोळे, तैसे देशी जना धडे ॥ ४ ॥
कुकर्मात तुझी बुध्दी, कसे सत्य कर्म आवडी ॥ ५ ॥
जैराम म्हणे तूं जैसा, पाहसी जनास तैसा ॥ ६ ॥

(७६)

ज्ञानयोग भक्तियोग, यांची बांधावी सांगड ॥ १ ॥
त्रिवेणी संगमावरी, सत्रावी झरा तो अंतरी ॥ २ ॥
तेथले घेऊनिया जळ, हारपला देह भाव ॥ ३ ॥
देहभान हरपला जिव शिवांत मिळाला ॥ ४ ॥
ब्रम्हरस ठसावला, नेत्री हरी हा दिसला ॥ ५ ॥
पाही सर्व ठायी मीच, भरून उरला जगदीश ॥ ६ ॥
जैराम म्हणे अनुभवी खण, पाहती योगी जन गुरूकृपे ॥ ७ ॥

(७७)

जो अनंत जन्माचा सिद्ध त्याला जगामध्ये काय बाध्य ॥ १ ॥
ज्या ज्या ठाई जाई, त्याचे पाठी देव राही ॥ २ ॥
देव असून काय उणे, काय लोकांचे देणे घेणे ॥ ३ ॥
ज्यांचे हृदयी देवांचे घर, त्याला कशाची फिकीर ॥ ४ ॥
सर्व चित्ता हरी करी, जैशी आई बाळापरी ॥ ५ ॥

जैराम म्हणे दन्य पुतळा, त्यांची कोना कळेना कला ॥ ६ ॥

(७८)

देवा कां देता संकटा वरी संकटे, मज प्रति वाटे सांगा मज ॥ १ ॥
कैसा मी अपराध केला देवा जगी, सांगा तुम्हीवेगी मज पामरा ॥ २ ॥
जे जे कामे करी अडथळे येतो भारी, काय दुराचारी जन्मा आले ॥ ३ ॥
चांगले समजून करीतो मी काय, आखरी तें नाम खोटे होई ॥४ ॥
ऐसे कैसे माझे संचिती लिहिले, मारून ना टाकिले जन्म होता ॥ ५ ॥
ऐसे कोठवरी घेशील कसोटी, झालो बहु कष्टी दुःखापती ॥ ६ ॥
जैरामदास म्हणे खरे हे बोलणे, येयोनिया देने संग मला ॥ ७ ॥

(७९)

कोठवरील राहील तुझे धोरपण, होतील यातना गर्वापायी ॥ १ ॥
सत्ता तुझी येथे काय आहे सांग, दुबळ्यासी तंग करितोसी ॥ २ ॥
करतोसी तंग अहंकार जोरा, मिळेल नाही थारा कोठे तुला ॥ ३ ॥
थारा नाही मिळे संताचे वाचूनी, व्यर्थ अभिमानी ठाकू नको ॥ ४ ॥
ठाकू नको तूं रे धन द्रव्यापायी, यम नेईल तेव्हां कोन आड होई ॥ ५ ॥
आड होतील कोण केले जेरे पुण्य, नाही तर शून्य नशीबी तूझ्या ॥ ६ ॥
जैरामदास म्हणे ध्यान इकडे देई, नाही घेई दुःख शिरी ॥ ७ ॥

(८०)

जन्मासी येवोनी करावे विचार, जीवा नाहीं थारा देवाविन ॥ १ ॥
याच देही डोळा पाहावे देवाला, विसरू नका नामा देवाचिया ॥ २ ॥
त्याचे विन हीत नाही या जगात, लाव तूं अर्थ आपुले मनी ॥ ३ ॥
काळाचिया तोंडी देह तुझा आहे, शोधून तू पाहे ज्ञान दृष्टी ॥ ४ ॥
उघडज्ञान दृष्टि समजे गुप्त गोष्टी, अंतरात साक्षी गुरू ठेवी ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे साधून घे संधी, व्यर्थची उपाधी लावूं नको ॥ ६ ॥

(८१)

लाभले चरन सदगुरूचे, जिवनसुखी झाले संत संगे ॥ १ ॥
घेऊनिया मार्ग संत संगतीचा, जोडीयली व्यथा जन्माचिया ॥ २ ॥
करोनी प्रपंच भजी हरी नाम, तयावीन सुगम मार्ग नाही ॥ ३ ॥
मार्ग हाची श्रेष्ठ सर्वात अुत्तम, जानी त्याचे मर्म पार होई ॥ ४ ॥
अहर्निशी ध्यान गुरूचे चरणी, कामाचे ठिकाणी पाही देव ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे ऐसे हे साधन, ज्याचे भाग्य असे त्याला जुळे ॥ ६ ॥

(८२)

कोणाची पाहून माहाल माडी, द्वेष कशाला अंतरी ॥ १ ॥
कोणाचे पाहून गज घोडे, मनी कां ठेवावे काळे ॥ २ ॥
पाहुनिया तुप पोळी, ठेवु नका मनी आवडी ॥ ३ ॥
पाहुनिया थाट श्रृंगार काय रूसावे त्यावर ॥ ४ ॥
जयराम म्हणे देवार्ने दिले, त्यावव गुजर करा आपुले ॥ ५ ॥

(८३)

कुणाची असो महाल माडी, आपली झोपडीच बरी ॥ १ ॥
कुणी खातो साखर सोजी, आमची कोरडी भाकर भाजी ॥ २ ॥
कुणी बसो गज अश्वावरी, आमची पायाची सवारी ॥ ३ ॥
कुणाचे अंगी शेला पागोटे, आम्हां चिंधी बरी वाटे ॥ ४ ॥
कुणी असो धनी गुणवानं, आम्हां राहो सदा लहानपणा ॥ ५ ॥
कोणास पाहून रूजू नये, द्वेष ठेवून होईल काय ॥ ६ ॥
जैराम म्हणे नशिबी लिहले, तैसे तैसे भोग आले ॥ ७ ॥

(८४)

काय म्हणावे कुणाला, जे जे संचिती लिहिला ॥ १ ॥
भोग असेल ते भोगावे, कोणाची दोष कां लावावे ॥ २ ॥
पूर्व कर्माचे ते फळ, आले आहे आम्हांवर ॥ ३ ॥

धैर्य धरूनिया मनी, त्यासी सोसावे आनंदानी ॥ ४ ॥
मार्ग सोडूं नये सत्य, जोवरी प्राण राही देहांत ॥ ५ ॥
आपुले कर्म करीत जावे, कौतुक पाहावे संचिताचे ॥ ६ ॥
जैराम म्हणे अेक चित्त, सर्व अर्पूनि भगवंता ॥ ७ ॥

(८५)

देवाचे ते नाम वेळोवेळी घेई, तेव्हां साह्य होई देव तुला ॥ १ ॥
साह्य तो होईल देव चिंतनाने, अंतरी जपणे हरी हरी ॥ २ ॥
जप हरी हरी मनाची तैयारी, तेव्हां तो कैवारी देव तुझा ॥ ३ ॥
होवूनी कैवारी तुझ्यासाठी राही, साह्य तो देई वेळोवेळी ॥ ४ ॥
संकटी तो देई साह्य वेळोवेळी, जैसी आई मीठी बाळापरी ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे भूलू नको नांव, अंतरी ती ठेव अहर्निशी ॥ ६ ॥

(८६)

जोवरी राही देहामध्यें प्राण, विसरू नको मनी राम नाम ॥ १ ॥
राम नाम तुझे धन हे संपत्ती, देई सदगती अंतःकाळी ॥ २ ॥
अंतःकाळी तुला कोणी न सोडवी, संग न देणार जगी कोणी ॥ ३ ॥
इथे सर्व आहे आपुल्या हिताचे, आपुल्या स्वार्थाचे प्रेम करी ॥ ४ ॥
ठेवताची प्रेम गरजे पुरते, काम निघों जाता विसरती ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे ऐक तुरे मना, दृढ घरी भाव देवा प्रति ॥ ६ ॥

(८७)

आम्ही झालो आता पोटोबाचे दास, आम्हां नाही आठ विठु तुझी ॥ १ ॥
तुझी आस नाही कधी केली देवा, नाहीं घडली सेवा ज्मा येवूनी ॥ २ ॥
जन्मा येवुनिया केले भजन, द्वेष मनीं राहे अहर्निशी ॥ ३ ॥
अहर्निशी असे कामामध्ये चिंता, कैसे भगवंता करू सांग ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे मायेचे गुलाम, न मिळे विश्राम जिवनासी ॥ ५ ॥

(८८)

कर्म ते आपुले करित राहावे, कौतुक पहावे संचीताचे ॥ १ ॥
दु:ख आले तरी धैर्य ना सोडावे, आनंदे सोसावे प्रेमभावे ॥ २ ॥
धरूनिया भाव आपुल्या अंतरी, कदाकाळी हरी विसरू नये ॥ ३ ॥
विसरू नये कधी सत्यवचनासी, कष्ट या देहासी होओ किती ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे सोडू नका निती, मिळेल सुगती जिवनासी ॥ ५ ॥

(८९)

मिळे जगामध्ये हरी नाम सार, करी तु विचार नाशीवंत ॥ १ ॥
नाशीवंत सर्व जे जे दीसे डोळा, एक तो सावळा अविनाशी ॥ २ ॥
अविनाशी तोची सर्व जगापोसी, सुत्र त्याचे हाती सर्व असे ॥ ३ ॥
सुत्र असे हाती बाहुलीचा खेळ, तैसा तो गारोडी खेळ दावी ॥ ४ ॥
राजारानी असो पंडीत महाज्ञानी, आहार काळाचे आहे सर्व ॥ ५ ॥
दहा ते अवतार देवाजीचे झाले, जपी तपी मेले त्याच ठाई ॥ ६ ॥
राहणार नाही सर्वही जाणार, करी तूं विचार आपुले मनी ॥ ७ ॥
जैरामदास म्हणे हरीविण सुख, त्याला तुरे जपी वेळो वेळां ॥ ८ ॥

(९०)

भोळे भावीकासी स्वार्थे भुलविले, जिवन व्यर्थ गेले कपटापाई ॥ १ ॥
टाकुनिया फासा दिन दुबळ्यावरी, केले घरोदारी त्राही त्राही ॥ २ ॥
त्राही त्राही केले लुटूनीया धन, स्वयें झाले भव्य धनवान ॥ ३ ॥
धनवान झाले गरीबा पासून, शोषूनिया खून भोळ्या लोकां ॥ ४ ॥
असी आहे बापा खोटी यांची रीत, करूं नका प्रित जैराम म्हणे ॥ ५ ॥

(९१)

नर जन्मा येवोनि हरी नामी लागा, कर्तव्यासी जागा याचवेळी ॥ १ ॥
याचवेळी जागा उघडा ज्ञानदृष्टि, हरिवीन गोष्टी करूं नका ॥ २ ॥
करूं नका गोष्टी खोट्या नाट्या इथें, जिवनाशी नित्य कष्ट बहु ॥ ३ ॥

बहु कष्ट भोग पाठी मागे रोड, षडरिपु हे रंग आपुला दावी ॥ ४ ॥
दावीतसे रंग पाहा जीवावरी, जीव तव नाडी यांचे पायी ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे पाहुनिया चला, जन्म हा लाभला देवा भेटी ॥ ६ ॥

(९२)

माया हे बंधन जन्माचे कारण, दुःख ते भोजणे जिवाप्रती ॥ १ ॥
जिवाप्रती भोग असे प्रारब्धाचा, पूर्व संचिताचे फल मिळे ॥ २ ॥
मिळतसे फळ जैसे केले कर्म, नाही तो बिश्राम हूर हूर ॥ ३ ॥
हुरहुर असे मनासी लागली, माया ही मोहनी फिरवीतसे ॥ ४ ॥
फिरवी संसारी करूनि अधिकार, जीवा नाहीं थार कोण्याठायी ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे जिवासी बंधन, करा ते खंडन हरी नामी ॥ ६ ॥

(९३)

हरी नाम हाची सुटण्याचा मार्ग, तत्काळ तूं लाग यांचे कडे ॥ १ ॥
याचेकडे लाग घेई खरे धडे, धावी संताकडे तत्क्षणी ॥ २ ॥
ततक्षणी धावी धरूनी सतसंग, बांधी पांडुरंग आपुले हृदयी ॥ ३ ॥
हृदयी कोंडी देव नाम उच्चारूनी, सुटे येणें जाणे जिवनाचे ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे भाव बळकट धरी, काम क्रोध माती तत्क्षणी ॥ ५ ॥

(९४)

काम क्रोध मोह लोभासी तूं त्याग, उदय होईल भाग्य संतसंगे ॥ १ ॥
होईल संतसंगी जिवनाचा उद्धार, नाहीं येर झार पाठीमागे ॥ २ ॥
नाही पाठीमागे, वासना ती लागे, ठाईच तीमागे फिरूनी जाई ॥ ३ ॥
फिरून जाई वासना नामाचे प्रतापे, त्रिपात ते नासे हरी चिंतनी ॥ ४ ॥
हरीचे चिंतन करा वेळो वेळी, मन तेव्हां वळी देवाकडे ॥ ५ ॥
मन हे रमलो देवाचीये पायी, जन्माची उपाधी तेव्हां सुटे ॥ ६ ॥
जैरामदास म्हणे पुण्य जगी करी, येवोनी संसारी नर जन्मला ॥ ७ ॥

(९५)

कुनब्याने काम मोठे हे बिकट, भूललो ती वाट देवा तुझी ॥ १ ॥
वाट ती चुकली भेट ती अंतरली, घेतले नाहीं नाम देवा कधी ॥ २ ॥
कधी नाही केले तुझे ध्यान पुजन, प्रपंची हे मन फिरे गरगरा ।. ३ ॥
फिरे गरगरा अंगी द्वेष सारा, दया शांती क्षमा हृदयी नाहीं ॥ ४ ॥
हृदयी नाहीं प्रेम व्रत नेम, कसे कळे वर्म देवा तुझे ॥ ५ ॥
जैराम म्हणे आम्ही मायेचे रे दास, नाहीं केली आस देवा तुझी ॥ ६ ॥

(९६)

पूर्वीचे संचित फळा आले आतां, राम नामी ध्यास ॥ १ ॥
अवचित जडल राम नामीं प्रेम, नर देही येऊनी संतसंग ॥ २ ॥
संतसंग लाभला सतचरण धरूनी, त्रिलोक्याची धनी पाहण्यासाठी ॥ ३ ॥
पाहण्यासाठी देव पंढरीचा राव, दिनाचा सोयरा पाहावया ॥ ४ ॥
पाहावया आलो जन्म घेऊनिया, हेच आहे मनी त्याचे प्रति ॥ ५ ॥
जैराम म्हणे हेची मागु आता, जन्मोजन्मी ठेवी चरणापाशी ॥ ६ ॥

(९७)

जन्म झाले माझे कुणबीयाचे कुळी,
जीवणावीन मासोळी तैसा गती ॥ १ ॥
जैसी गती झाली पाण्यावीन मीन,
नाही तिला स्थान कोण्याठायी ॥ २ ॥
कोण्याठायी नाही मिळे तिला थारा,
तैसा मी आंधळा देवावीन ॥ ३ ॥
देवावीन आंधळा सुचे नाही काही,
फिरतो दिश्या दाही सैरावैरा ॥ ४ ॥
सैरावैरा फिरतो प्रपांचे पायी,
मुखी येत नाहीं नाव देवा ॥ ५ ॥

नाव घेत नाहीं पडली आटाआटी,
कशा होतील भेटी पामराशी ॥ ६ ॥
पामराशी नाही बुद्धी आणि ज्ञान,
ऐकील ही किव कोण माझी ॥ ७ ॥
कोन ऐके किव असा अपराधी,
पाठीशी उपाधी मायेची ही ॥ ८ ॥
जैरामदास म्हणे भूलूनिया गेलो,
कामी नाही आलो देवा तुझ्या ॥ ९ ॥

(९८)

अंतरी तूं ठेव साठवूनी हरी, प्राण जावो तरी भूलू नको ॥ १॥
भुलू नका कोणी त्र्यैलोक्याचा धनी तोच चक्रपाणी सोय लावे ॥ २ ॥
सोय लावी जैसी मनी तुझे भाव, तैसा देई ठाव तुझा बापा ॥ ३ ॥
ठाव देईल तुला जैसे करशील कर्म, तैसे वर्म जन्मोजन्मी ॥ ४ ॥
जन्मोजन्मी करशील तुरे जनसेवा, अंतःकाळीं मेवा मोक्षपद ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे विचार तूं करी, देवा वीण सोडी कोण तुला ॥ ६ ॥

(९९)

तुला कोण सोडी संसार बंधनी, एक चक्रपाणी वाचूनीया ॥ १ ॥
एक चक्रपाणी सर्वांचा करतार, जिवाचा उद्धार त्याचे पायी ॥ २ ॥
त्याचे पायी असे सर्व सुत्रदोरी, जैसा तो करी तैसा होये ॥ ३ ॥
अशी त्याची लिला कोणाशी न कळे, त्याचीया बळे विश्व चाले ॥ ४ ॥
न कळे रे अंत त्याला हा कोणाला, देवादिका आणि साधु मुनीला ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे पोशीतो जगाशी, आम्हां पामराशी काय कळे ॥ ६ ॥

(१००)

आतातरी जागा येवुनिया जन्मा, आयुष्य आरामा खोवूं नका ॥ १ ॥
येवुनिया साधा आपुले ते हीत, हरी चरणी चित्त लावा तुम्ही ॥ २ ॥

चित्त लावा तुम्ही करोनी सतसंग येणार नाही वेळ मग ऐसी ॥ ३ ॥
वेळ नाहीं मिळे देव दर्शन घेण्या, सावध होई प्राण्या आतातरी ॥ ४ ॥
एक एक श्वास अनमोल किंमतीचा, खोवी तोशी तुरे माये पायी ॥ ५ ॥
येथे तुला कोनी संग ना देणार, अंत काळी न होणार देवा बिन ॥ ६ ॥
जैरामदास म्हणे  ऐक माझे बोल, करी रे तूं मोल जिवनाचे ॥ ७ ॥

(१०१)

दुसऱ्याची निंदा करतोशी काय, जन्म तुझा होई राक्षसाचा ॥ १ ॥
खरे सांगतो तुला ठेवी तूं लक्षांत, पाही तूं मनांत आपले गुण ॥ २ ॥
तुझी आई गेली होती भूतापाशी, तैसी ती प्रचिती घडली तुला ॥ ३ ॥
घडली तुला प्रचिती आईचे संस्कारे, म्हणुनिया जाशी आडमार्गे ॥ ४ ॥
गोडगोड बोलशी समोर येवुनी, राहे तुझी मनी छलकपट ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे खऱ्याशी ओळख, नाही तर नरक पुढें आहे ॥ ६ ॥

(१०२)

आपण झिजावे ज्याचे साठी, तोची करी निंदा मोठी ॥ १ ॥
वाढले जगी भस्मासूर, जगी केला अत्याचार ॥ २ ॥
करी न पापाचा विचार, खऱ्या पुरूषा टाकती जाळ ॥ ३ ॥
करूनिया त्राही त्राही, दया तिळमात्र नाहीं ॥ ४ ॥
जैराम म्हणे निर्दयी लोक, म्हणूनी वाढले जगी दुःख ॥ ५ ॥

(१०३)

कुणब्या पोटी दिला देवा, जन्मभर ना विसावा ॥ १ ॥
नाम मुखी आले नाही, देवा प्रपंचाचे पायी ॥ २ ॥
अंगी मी तूं पण भरले, नाहीं सत्य ओळखले ॥ ३ ॥
औत घेऊनी खांद्यावरी, काम करी शेतकरी ॥ ४ ॥
काम करता भरले शीण, नाहीं तुजे मनी ध्यान ॥ ५ ॥
कीव नाही मनी थोडी, मारतो बैला तुतारी ॥ ६ ॥

आयुष्याचा गेला काळ, पाठीमागे हा गोंधळ ॥ ७ ॥
जैराम म्हणे पडली भूल, अंतरले ते विठ्ठल ॥ ८ ॥

(१०४)

भावापाशी देव देवापाशी भाव, तिते पंढरीराव उभा आहे ॥ १ ॥
सोडुनि वैकुंठ जाई भक्ताकडे शिकविण्याशी धडे भक्तिचे हे ॥ २ ॥
करोनिया दास तोडी मायापाश, मोक्षकरी जिरा तत्क्षणी ॥ ३ ॥
कवटाळूनीया धरी तो भक्तासी, मिळवी स्वरूपी करूनी त्यासी ॥ ४ ॥
देवभक्त दोन्ही भेद हा मीटला, संशय फिटला जन्म मृत्युचा ॥ ५ ॥
जैराभदास म्हणे बहु पुण्य पदरी, जन्म घेतो हरी त्यांचे घरी ॥ ६ ॥

(१०५)

घेवूनिया जन्म भक्ताचिया घरी, कूळ तो उद्धारी सर्व त्याचे ॥ १ ॥
देऊनिया त्यांना भक्तिचे ते ज्ञान, ठेवी त्याची शान त्र्यैलोक्यांत ॥ २ ॥
ऐसा तो देव जन्म घेई पोटी, दूरकरी भ्रांती दावी लीला ॥ ३ ॥
मोहुनी सर्वाला आपुला करोनी, दाऊनीया आत्मानुभवी खुणा ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे भक्ताचा हितकारी, जाऊनिया करी रक्षी त्या ॥ ५ ॥

(१०६)

तुका म्हणता म्हणता वेळा गेला किती,
अजून ती प्रचिती घडली नाही ॥ १ ॥
घडली नाही त्याला सेवा करण्या भाव,
कैसा विठुराया भेट देई ॥ २ ॥
संकल्प विकल्प तुमचे आंत आहे,
कैसा देव पाहसी सर्वाठायी ॥ ३ ॥
जोवरी तुझे मन भ्रमनांत आहे,
कैसा तुज साह्य देव होई ॥ ४ ॥
आता तरी डोळे उघडा जैराम म्हणे,

पाहुनिया घेणे तुका हृदयी ॥ ५ ॥

(१०७)

रात्रं दिवस भजन हरी पाठ करशी दया न ठेवली मनी कांही ॥ १ ॥
मनी तुझे आहे द्वेष भाव भरले, नाहीं ते पाहिले हरी चरण ॥ २ ॥
धन द्रव्य लोभ देह अभिमान, दावी थोरपण जगामध्यें ॥ ३ ॥
माझे माझे म्हणुनी पाहे सर्वठायी अंहाकरा पाई भूलला देव ॥ ४ ॥
संतसमागम विसरूनी गेला, जन्मासी नाडला जैराम म्हणे ॥ ५ ॥

(१०८)

जन्माशी तूं आला हिताशी नाडला,
आयुष्य गमाविले मोलाचे ते ॥ १ ॥
विचार नाही केला वीट संगतीचा,
श्वास हा मोलांचा खोऊनिया ॥ २ ॥
करणे होते तुला त्याशी नाहीं केले,
व्यर्थ मेळे पाही मायेचे ते ॥ ३ ॥
जैरामदास म्हणे खोवूं नको वेळ,
उभा आहे काळ टपोनिया ॥ ४ ॥

(१०९)

आपुले ते हीत नाही ते साधीले, दुसऱ्याशी बोले हित साधा ॥ १ ॥
खोटे ते बोलने त्या न सोडिले, दुसऱ्याशी म्हणे सत्य बोला ।. २ ॥
आपला उद्वार तुनें नाही केला, जिवन उद्धारा जन्मा येवूनी ॥ ३ ॥
मनी तुजे द्वेष, देतो उपदेश, कैसा तुझा भेष मानी जन ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे कैसी तुझी चाल, कोण करील मोल तुझे जगी ॥ ५ ॥

(११०)

देवा चरणी जडेल चित्त, त्याची नित्य घडो प्रित ॥ १ ॥
त्याचे प्रेम सर्वांवरी, तोची माजा साह्य कैवारी ॥ २ ॥

सत्य असे ज्याची वाचा, माझा विसावा जिवाचा ॥ ३ ॥
ज्याचे मन असे निर्मळ, त्याचे पाशी उबा घननीळ ॥ ४ ॥
ज्याच्यापाशी दया शांती, नित्य डोळा देव मूर्ति ॥ ५ ॥
जैराम म्हणे अंगी गुण, राहो त्याचे चरणी ध्यान ॥ ६ ॥

(१११)

सर्व जनावरी ठेवी बहु दया, तेव्हां कृपा करी देवराया ॥ १ ॥
सोडा द्वेष भाव हरी पदी दृढमन, तेव्हां मिळे रे देव खून ॥ २ ॥
अहंकाराचा वारा न लागो या जीवा, भेटण्याकेशवा याच जन्मी ॥ ३ ॥
जे जे दिसे दृष्टि पुढे, ते ते पहावे देव रूपे ॥ ४ ॥
पुजावे अतिथी आपुल्या अंतरी, सोडा ना नियम प्राण जाओ ॥ ५ ॥
जैरामदास म्हणे हीच खरी भक्ति, मिळवा ती मुक्ती जिवंतपणी ॥ ६ ॥

---

॥जय लहरी । जय मानव ॥

# ॥ आरती ॥

(चाल - ओम जय जगदीश हरे...)

ॐ जय सद्गुरूनाथा, स्वामी जय जय ब्रम्हस्वरूपा।
ज्ञान बुद्धिचे दाता, निरंजनपुरी रमता॥ धृ॥

उद्धारास्तव जड जिवाचा भूवरी अवतरला।
काढूनी भ्रांती सारी, स्वस्वरूपी मेळविला॥ १॥

चौदा भुवनी प्रकाश झळके, ज्योती रंग बिरंगी।
स्वरूप अलख निरंजन, जिव होतसे दंग॥ २॥

सहस्त्र दलावर आसन तुझे, हे पितांबर धारी।
चिन्मय स्वरूप तुझे हे, चमके गगनावरी॥ ३॥

अनहद नाद सोहमं मंत्राचा, अजपाजप ध्वनी।
चिद्रुप सत्यस्वरूप, अहंब्रम्ह नयनी॥ ४॥

घडघड घड्याळ घंटा वाजे, चमके जनु बिजली॥
सुदबुद सारी हरलो, वाचा तिही खुंटली॥ ५॥

जैरामदास स्वरूपी मिळाले, श्री गुरूचे प्रसादे।
विश्व भरले नयनी, जल घागरी जैसे॥ ६॥

---

